Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)
*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P013
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

# भारतीय ज्ञान परंपरा, संपत्तीचा हक्क आणि स्त्रियांचे सक्षमीकरण

**कु.अनिता पुरुषोत्तम गणोरकर**
संशोधक
पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग,
रा. तू. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**प्रा.डॉ. धनंजय सोनटक्के**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय
वर्धा – ४४२००१

**प्रस्तावना**

भारतीय ज्ञान परंपरा ही प्राचीन काळापासून भारतीय समाजात प्रचलित असलेली शिक्षण प्रणाली आहे. ज्ञान परंपरा ही भारतीय संस्कृतीचा मूलभूत पाया आहे आणि भारतीय समाजात संस्कृती ही केंद्रभिमूक आहे. तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे .भारतीय ज्ञान परंपरेत वेद ,वेदांग ,उपनिषद ,श्रुती , स्मृतीपासून ते आयुर्वेद साख्यसिद्धांत ,तत्त्वज्ञान ,धर्मशास्त्र, अर्थशास्त्र ,विज्ञान ,खगोलशास्त्र ,गणित या स्वरूपापर्यंत ज्ञानाचा विशाल संग्रह आहे. सध्याच्या शिक्षण पद्धतीत भारतीय ज्ञान परंपरेचा समावेश करण्यात आलेला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये भारतीय ज्ञान परंपरेवर (IKS) भर देऊन विद्यार्थ्यांना भारतीय प्राचीन परंपरा ,संस्कार- संस्कृती, मातृभाषा या सर्व शिक्षण पद्धतीचे विद्यार्थ्यांना ज्ञान व्हावे हा यामागचा उद्देश आहे. सर्व गुण संपन्न विद्यार्थी घडवितांना विद्यार्थ्यांचा सामाजिक सांस्कृतिक विकास घडवून निस्वार्थी,त्यागी ,सर्वज्ञानी विद्यार्थी तयार व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. प्राचीन काळी भारतीय शिक्षण व्यवस्थेचे जे स्थान होते ते स्थान परत मिळविण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण प्रयत्नशील आहे. भारतीय ज्ञानाचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्राचीन काळापासून अतिशय व्यापक आणि सूक्ष्म स्वरूपाचा राहिलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरावलोकन करणे.
२) संपत्तीचा हक्क आणि सक्षमीकरण यातील सहसंबंध शोधणे.
३) लिंगभावावर आधारित मालकी हक्काच्या प्रभावाचे मूल्यमापन करणे.
४) सामाजिक - सांस्कृतिक अडथळ्यांचे विश्लेषण करणे.
५) आधुनिक काळात सक्षमीकरणाची दिशा निश्चित करणे.

**संशोधन पद्धती:-**

"प्रस्तुत संशोधनात 'वर्णनात्मक संशोधन पद्धती'चा अवलंब करण्यात आला आहे . या पद्धतीद्वारे नागपूर जिल्ह्यातील स्त्रियांच्या संपत्तीच्या मालकी हक्क ाचे आणि त्यातून होणाऱ्या सक्षमीकरणाचे वस्तुनिष्ठ वर्णन केले जाईल. भारतीय ज्ञान परंपरेतील तरतुदी आणि आधुनिक कायदेशीर अधिकार याचा प्रत्यक्ष व्यवहारात कसा वापर होतो याचे विश्लेषण करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरली आहे. संशोधकांनी केवळ माहिती गोळा न करता समाजातील प्रचलित प्रथा आणि स्त्रियांची मालमत्ता विषयक मानसिकता याचे सविस्तर चित्रण या पद्धतीद्वारे केले आहे.

**भारतीय ज्ञान परंपरा**

भारतीय संस्कृती ही सर्वात जुनी संस्कृती आहे. या संस्कृतीने सुमारे ५००० वर्षापूर्वीपासून तत्वज्ञान , श्रद्धा- विश्वास ,मूल्ये ,ज्ञान जपलेले आहे. भारतीय परंपरा ही ज्ञानाचे प्रतीक आहे .भारतीय ज्ञान परंपरा ही १४ विद्या आणि ६४ कलांनी मिळून बनलेली आहे .भारतीय ज्ञान परंपरेत ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद अशा चार वेदांचा समावेश आहे. उपवेदांमध्ये वैद्यकशास्त्र (आयुर्वेद), युद्धशास्त्र (धनुर्वेद), संगीत कला (गंधर्ववेद), स्थापत्य /अभियांत्रिकी (शिल्पवेद) तसेच वेदांगांमध्ये व्याकरण, छंद ,ज्योतिष्य, शिक्षा ,कल्प यांचा समावेश आहे. तर पुराणांमध्ये रामायण महाभारतासारखे हिंदू धर्म ग्रंथ जीवनमूल्य शिकवून जातात. भारतीय ज्ञान परंपरा ही फक्त हिंदू धर्मासाठी किंवा अध्यात्मापुरतीच मर्यादित नाही तर त्यात विज्ञान सुद्धा मोठ्या प्रमाणात दडलेले आहे. गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र कृषी आणि पर्यावरण, तत्त्वज्ञान यासारखे विषय विज्ञान शिकवून जातात. आर्यभट्ट भास्कराचार्य यांनी शून्याचा शोध, दशांश पद्धती आणि ग्रहांच्या गतीचा अभ्यास सांगितला .चरक आणि सुश्रुत संहिता मध्ये शरीरशास्त्र ,शस्त्रक्रिया आणि नैसर्गिक उपचार पद्धती तर न्याय, साख्य ,योग आणि वेदांत सारखी ६ प्रमुख दर्शने सांगितलेली आहेत. वृक्षांना देव मानून निसर्गाचा समतोल राखण्याची पद्धती आपल्या भारतीय ज्ञान परंपरेत आहे.

**"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता : ।"**

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

भारतीय ज्ञान परंपरेनुसार जिथे स्त्रियांची पूजा आणि सन्मान होतो तेथेच परमेश्वर वास करतो असे म्हटले जाते कारण प्राचीन भारतात स्त्रियांचे स्थान सन्मानाचे होते .स्त्री ही फक्त उपभोगाची वस्तू नसून प्रेम, आदर, सहनशीलता ,ज्ञानाचे ,प्रतीक आहे. स्त्रियांना समाजाच अंग मानल जाई. भारतीय ज्ञान परंपरेत स्त्रियांना केवळ 'गृहलक्ष्मी 'च मानले गेले नाही तर औदार्य, त्याग ,जिव्हाळा ,स्नेह, प्रेमाचे प्रतीक मानल्या जात होते .प्राचीन काळी म्हणजे वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचे अधिकार होते. विश्वतारा, गार्गी, लोपमुद्रा, मैत्रेय ,उपाला यासारख्या विदुषी स्त्रियांनी स्वतंत्रपणे ऋचा रचून तत्त्वज्ञानात भर घातली. त्याकाळी स्त्रियांना सुद्धा वेदाचे ज्ञान मिळत असून 'उपनयन' संस्कार होत होते. कुटुंब संस्थेत सुद्धा तिला मानाचे स्थान असून, तिचा दर्जा त्या काळी समाजात श्रेष्ठ होता.

ऋगवैदिक काळाच्या तुलनेत उत्तर वैदिक काळात स्त्रियांच्या स्वातंत्र्यात काही प्रमाणात घट झाली . पितृसत्ता पद्धतीत वाढ होऊन स्त्रियांच्या सामाजिक ,धार्मिक ,राजकीय स्थितिच्या दर्जात घसरण झाली. उपनयन विधी तसेच ब्रह्मचर्याश्रमात अभ्यास करणाऱ्या स्त्रियांवर बंधने आणल्या गेली तरीसुद्धा काही स्त्रिया प्रस्थापित विरोध स्वीकारून विद्याभ्यास करीत होत्या. त्यात गार्गी, मैत्रय, लोपामुद्रा ,सुलभा यासारख्या उच्चवर्णीय स्त्रियांचा समावेश होता .विवाह संस्काराला ताठर स्वरूप प्राप्त होऊन पुत्रप्राप्तीचे महत्त्व वाढले. 'ऐतरेय ब्राह्मण' सारख्या ग्रंथामध्ये पुत्रप्राप्तीला महत्त्व दिले गेले. 'पुत्राचा जन्म 'हा आनंदाचा तर 'मुलींचा जन्म 'विनाशाचे कारण मानले जाऊ लागले .पुरुष प्रधान संस्कृतीचे महत्त्व वाढून बहुपत्नीत्वाच्या प्रत्येक वाढ झाली. राजकीय सहभाग व धार्मिक सहभाग यावरचे अधिकार काढून घेण्यात आले. धार्मिक सहभागात अस्तित्व केवळ पतीच्या सोबत राहण्यापुरतेच मर्यादित राहिले. ऋग्वेदकाळात स्त्रियांना 'स्त्रीधन' मिळत होते, स्त्रिया त्या स्त्रीधनाचा स्वतःसाठी मनासारखा वापर करू शकत होत्या पण त्या 'स्त्रीधन' वर बंधने आलीत आणि स्त्रियांच्या वारसा हक्क , संपत्तीतील अधिकार काढून टाकण्यात आले. वडिलांच्या मालमत्तेत समान वाटा मिळणे स्त्रियांसाठी कठीण झाले . उत्तर वैदिक काळात श्रम विभागणी आणि जाती व्यवस्था हळूहळू उदयास आल्याने स्त्रियांच्या हक्क अधिकारावर गदा आली.

बौद्ध काळ आणि स्मृती काळ स्त्रियांच्या स्थितीत बदल घडविणारे कालखंड ठरले. बौद्ध काळात स्त्री आणि पुरुष असा भेद न मानता गौतम बुद्धांनी सर्वांना आध्यात्मिक आणि सामाजिक स्वातंत्र्य दिले. गौतम बुद्ध ही स्त्री स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. 'आम्रपाली 'सारख्या स्त्रियांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि समाजात आपले स्थान निर्माण केले यातून गौतम बुद्धांचा स्त्रियांविषयी समतावादी दृष्टीकोन दिसून येतो. अनेक स्त्रियांना 'धम्म' आणि 'संघात 'प्रवेश दिला आणि स्त्रियांसाठी 'भिक्खूंनी संघ' स्थापन केले .गौतम बुद्धांच्या विचारामुळे या काळात स्त्रियांच्या दर्जा आणि भूमिकेत सुधारणा घडून आली.

स्मृति काळ हा स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा काळ होता. स्मृतकाळ विशेषतः मनुस्मृतीचा काळ म्हणून ओळखला जातो. 'न स्त्री स्वातंत्र्यमहिते ' (स्त्री स्वातंत्र्याचा पात्र नाही) असे विचार या काळात समाजात रुजविले गेले. हा काळ 'विष्णू संहिता', 'पाराशर संहिता', 'याज्ञवल्क्य संहिता', 'मनुस्मृति' याची रचना झाली. म्हणजेच हा काळ हिंदू धर्मशास्त्राचा काळ म्हटल्या जाते. या काळात स्त्रियांना 'चूल आणि मूल 'एवढ्या पुरतेच मर्यादित ठेवले. स्त्रियांना पुरुषांच्या वर्चस्वाखाली राहणे बंधनकारक झाले. त्यांना हक्क आणि अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले. स्त्रियांकडून 'स्त्रीधन' , 'वारसा हक्क ाचा' अधिकार काढून घेण्यात आला आणि स्त्रिया वंचित झाल्या. याच काळात बालविवाह, विधवा विवाह बंदी ,जठर विवाह यासारख्या अनिष्ट प्रथा समाजात रुजल्या. स्त्रियांचे नटणे, वागणे, बोलणे यावर बंदी घालण्यात आली. स्त्रीला तुच्छ समजून स्त्री ही पुरुषांच्या पायाखालची चप्पल अशी समजूत समाजात निर्माण झाली. जी स्त्री पूर्व वैदिक काळात समाजाचा , कुटुंबाचा केंद्रबिंदू होती, आदर्श होती ती स्त्री आता पारतंत्र्यात, निर्बल , असहाय्य म्हणून जगू लागली.

मध्ययुगीन काळात परकीयांच्या आक्रमणामुळे त्यांच्या प्रभावामुळे भारतीय संस्कृतीचे रक्षण करणे कठीण झाले. त्याचे नकळत नकारात्मक पडसाद लिंगभावावर पडले. 'पुराणमतवाद्यांनी संस्कृतीचे रक्षण, स्त्रियांचे सतित्व आणि रक्ताची शुद्धता टिकवून ठेवण्यासाठी स्त्रियांशी संबंधित नियमांना अधिक कठोर बनविले'. पुरुषसत्ताक पद्धतीचा प्रभाव वाढला आणि स्त्रीचे स्वतःचे अस्तित्व नष्ट झाले. स्त्रियांची भूमिका फक्त '' आणि 'घरगुती कामापुरतेच' मर्यादित राहिली. मुलीने बालपणी वडिलांच्या, तारुण्यात पतीच्या ,वृथापकाळात मुलांवर विसंबून राहावे अशी समाजाची मानसिकता बनलेली होती. स्त्रियांकडून संपत्तीचा अधिकार काढून घेतला. विधवांना पतीच्या संपत्तीत केवळ 'संपत्ती उपभोगाचा ' अधिकार मिळाला होता पण ती संपत्ती वेळप्रसंगी विकण्याचा किंवा कोणालाही दान देण्याचा अधिकार त्या स्त्रीला नव्हता.

स्वातंत्र्यपूर्व काळात १८ वे शतक १९४७ पर्यंत प्रबोधनाचा काळ किंवा स्त्रियांच्या संघर्षाच्या काळ म्हणून ओळखला जातो. या काळात ब्रिटिश राजवट ,धर्मसुधारणा चळवळी , समाज सुधारणा चळवळीमुळे स्त्रियांच्या

स्थितीत मोठ्या प्रमाणात अमुलाग्र बदल घडून आले. समाजात असलेल्या अनिष्ट प्रथा मोडकळीस आणण्याचा प्रयत्न सर्वप्रथम राजाराममोहनरॉय , महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांनी केला. राजाराममोहनरॉय यांच्या प्रयत्नाने लॉर्ड बेंटिंग ने १८२९ मध्ये सती प्रथेवर कायदेशीर बंदी घातली तसेच १८०२ मध्ये 'बालहत्या प्रतिबंधक कायदा' याची मुहूर्तमेढ रोवली. ज्ञानबंदी ,बालविवाह, केशवपण, जरठ कुमारी विवाह ,घटस्फोट, पडदा पद्धती, स्त्री भ्रूण हत्या, सती प्रथा अशा अनेक समाजसुधारणा चळवळीला सुरुवात झाली. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. शिक्षणाचा अधिकार मिळणे हे स्त्रियांच्या दृष्टीने सक्षमीकरणासाठी एक मोठे पाऊल होते.

ब्रिटिश काळात स्त्रियांच्या आर्थिक आणि कौटुंबिक हक्कासाठी काही कायदेशीर सुधारणा करण्यात आल्या.

- वारसा हक्क संबंधी कायदा ,१९२८
- हिंदू महिलांचा मालमत्ता अधिकार कायदा, १९३७

१९२८ वारसा हक्क संबंधी कायदा, हिंदूंची अक्षमता दूर करण्याच्या दृष्टीने म्हणजे आजारी किंवा अपंग व्यक्तींना वारसा हक्कापासून वंचित ठेवता येणार नाही. तसेच १९३७ चा वारसा हक्क कायदयाने विधवा स्त्रियांना त्यांच्या पतीच्या मालमत्तेत हक्क मिळवून दिला पण हा हक्क अधिकार स्त्रियांच्या दृष्टीने परिपूर्ण नव्हता, तरीसुद्धा महिलांच्या सक्षमीकरणाचे पहिले पाऊल होते असे म्हणता येईल. पुढे स्त्रियांनी स्वतःच्या हक्क मागण्यासाठी काही संघटनांची निर्मिती केली.

- विमेन्स इंडियनअसोसिएशन (WIA ),१९१७
- ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स (AIWC),१९२७

या संघटनांनी महिलांच्या शिक्षण आणि कायदेशीर हक्कासाठी काम केले.

स्वातंत्र्योत्तर काळात, १५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला. पण स्त्रियांवर सामाजिक, धार्मिक, आर्थिक बंधने मात्र तशीच होती. 'स्त्री'चे स्थान समाजात दुय्यम होते, तिचा समाजात कुटुंबात दर्जा निम्नच होता. ही सामाजिक परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करताना स्त्री समतेला , स्त्रियांच्या हक्क अधिकाराला प्राधान्य दिले.

भारतीय राज्यघटनेत कलम १४ नुसार सर्व नागरिकांना समान अधिकार तर कलम १५ नुसार लिंगभेदाच्या आधारावर जात, लिंग, जन्मस्थान असा नागरिकांविरुद्ध राज्य भेदभाव करणार नाही. स्त्रियांना नोकरी आणि शिक्षणापासून वंचित ठेवता येणार नाही. राजकारण, प्रशासन, नोकरी या सर्व ठिकाणी स्त्रियांना आरक्षण दिले म्हणजे कायद्यासमोर स्त्री - पुरुष समान आहेत दोघांनाही समान हक्क अधिकार आहेत . डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना प्रवाहात आणण्यासाठी उचललेले हे विशेष पाऊल होते.

**संपत्तीचा हक्क आणि सक्षमीकरण**

आजच्या आधुनिक काळात आणि जागतिकीकरणाच्या युगात भारतीय स्त्री पुरुष समानतेच्या दिशेने पाऊल टाकत असल्याचे चित्र दिसत असले तरी प्रत्यक्षात स्त्रियांना आजही अनेक क्षेत्रात समान संधी उपलब्ध नाहीत. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचे अनेक प्रश्न आजही प्रलंबित आहेत. जोपर्यंत समाजातील लिंगभेदाचे पूर्वग्रह पूर्णपणे नष्ट होत नाहीत ,तोपर्यंत स्त्री शिक्षण , समान संधी आणि संपत्तीवरील समान वाटा यांची सांगड घालणे कठीण आहे. समाजात झालेली जाणीव जागृती आणि स्त्री शिक्षणाचा प्रसार यामुळे सकारात्मक बदल घडत आहेत. भारतीय संविधानातील विविध तरतुदी, कायदे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला परिषदांच्या प्रभावातून राष्ट्रीय व राज्य महिला आयोगाची स्थापना झाली. यामुळे स्त्री सक्षमीकरणासाठी अनेक कायदे आणि धोरणे अस्तित्वात आली. शिक्षण, नोकरी ,व्यवसाय ,कला, साहित्य आणि राजकारण या क्षेत्रातील स्त्रियांच्या वाढत्या सहभागामुळे समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. मात्र समाजात आजही संपत्ती हा घटक सत्ता आणि प्रतिष्ठेचे महत्त्वाचे केंद्र मानला जातो.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिल्यास,भारतात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले गेले होते आणि त्यांचे कार्यक्षेत्र केवळ घराच्या चार भिंतीपर्यंत मर्यादित होते. पूर्वी मूठभर उच्च वर्णीय स्त्रियांकडे असलेल्या 'स्त्रीधनाचा' अपवाद वगळता, सर्वसामान्य स्त्रियांना कोणत्याही प्रकारच्या चल- अचल संपत्तीवर मालकी हक्क नव्हता. सामान्य कुटुंबातील स्त्रियांना माहेरच्या किंवा सासरच्या संपत्तीत कायदेशीर अधिकार नाकारले गेले होते. काही कालखंडात तर स्त्रियांना अत्यंत हिन दर्जाची वागणूक मिळाल्याने त्यांना स्वतःच्या मेहनतीने कमावलेल्या संपत्तीवरही मालकी सांगता येत नसे. समाजात प्रतिष्ठा, अधिकार आणि सामाजिक स्थान मिळविण्यासाठी पैसा किंवा संपत्ती स्वतःच्या मालकीची असणे अत्यंत आवश्यक असते. संपत्तीच्या मालकी हक्क अभावी स्त्रियांना

समाजात योग्य सन्मान मिळू शकला नाही उलट त्यांच्याशी भेदभाव करून त्यांचे शोषण करण्यात आले. जर स्त्रियांना संपत्तीचे समान मालकी हक्क मिळाले, तर त्यांना केवळ समाजात प्रतिष्ठा आणि स्थान मिळणार नाही त्यातून मोठे सामाजिक परिवर्तन सुद्धा घडून येईल.

**भारतीय स्त्रियांचे वारसा हक्क: कायदेशीर प्रवास**

ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, स्त्रियांना मिळालेल्या संपत्तीचा उपभोग घेण्याचा अधिकार केवळ त्यांच्या हयातीपर्यंत मर्यादित होता. त्यांच्या मृत्यूनंतर, संबंधित मालमत्तेवर पतीच्या नातेवाईकांचा कायदेशीर हक्क प्रस्थापित होत असे. १९५६ पूर्वीच्या हिंदू कायद्यांमध्ये 'स्त्रीधन' ही संकल्पना अस्तित्वात होती,परंतु स्त्रीची सर्वच संपत्ती 'स्त्रीधन' म्हणून ओळखली जात नसे. कोणती मालमत्ता स्त्रीधन आहे, हे ती मालमत्ता कोणाकडून आणि कोणत्या वेळी मिळाली यावर अवलंबून असे. विशेष म्हणजे, अविवाहित किंवा विधवा स्त्रीचा स्वतःच्या कष्टाने मिळवलेल्या संपत्तीवर पूर्ण अधिकार असला ,तरी विवाहित स्त्रीला असा अधिकार नाकारला गेला होता.

**१९५६ चा हिंदू वारसा हक्क कायदा :-**

भारतीय संविधानातील स्त्री पुरुष समानतेचे तत्व १९५६ च्या हिंदू वारसा हक्क कायद्याने खऱ्या अर्थाने अमलात आणले या कायद्याची काही वैशिष्ट्ये खालील प्रमाणे:-

- कुटुंबातील महत्त्वाचा घटक म्हणून स्त्रीला कन्या, पत्नी आणि माता या विविध नात्यांनी वारसा हक्क देण्यात आला.
- वडिलांच्या मालमत्तेत मुलांच्या बरोबरीने मुलींनाही समान वाटा मिळण्याची तरतूद झाली.
- पतीच्या निधनानंतर पत्नीला सर्व मुलांप्रमाणेच मालमत्तेत समान हिस्सा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला .
- स्त्रीला तिच्या इस्टेटची पूर्ण मालकी (मुखत्यार) देण्यात आली ,ज्यामुळे ती स्वतःच्या इच्छेनुसार संपत्तीचे व्यवस्थापन करू शकेल.

**सामाजिक वास्तव आणि आव्हाने:-**

कायदेशीररित्या अधिकार असूनही, प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांचे आर्थिक स्वातंत्र्य आजही मर्यादित आहे. समाजातील सद्यस्थिती खालीलप्रमाणे:-

- आजही खूप कमी स्त्रिया आपल्या संपत्तीबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात.
- वडील किंवा भावाकडून कायदेशीर हिस्सा मिळवणे, तसेच आयुष्यभर कष्ट केलेल्या सासरच्या मालमत्तेत वाटा मिळवणे स्त्रियांसाठी आजही कठीण आहे.
- आर्थिकदृष्ट्या सक्षम स्त्रिया देखील अनेकदा आपली संपत्ती स्वतःच्या मर्जीने वापरू शकत नाहीत, कारण कुटुंबाची आर्थिक सूत्रे पुरुषांच्या ताब्यात असतात.
- कायदेशीर बदलांकडे दुर्लक्ष करून, आजही मालमत्ता प्रामुख्याने वडिलांकडून मुलाकडेच हस्तांतरित करण्याची प्रथा समाजात टिकून आहे.

**पितृसत्ताक व्यवस्था आणि स्त्रियांची दुय्यमत्व:-**

वर्तमान स्थितीतील आर्थिक व्यवस्था आजही स्त्रियांचे दुय्यमत्व अधोरेखित करते. घरातील कष्टाच्या कामाचा कोणताही आर्थिक मोबदला स्त्रियांना मिळत नाही. तसेच पती जिवंत असेपर्यंत पत्नीला त्याच्या चालू उत्पन्नात किंवा मालमत्तेत वाटा मिळण्याची कोणतीही कायदेशीर तरतूद नाही. संपत्तीवर केवळ पुरुषांचाच अधिकार रहावा, यासाठी पितृसत्ताक व्यवस्था सतत प्रयत्नशील असते आणि भारतातही ही मानसिकता मोठ्या प्रमाणावर दिसून येते.

**महिला सक्षमीकरण:-**

आजच्या जागतिक परिस्थितीत महिला सक्षमीकरण ही एक कळीची संकल्पना ठरली आहे. या संकल्पनेला खऱ्या अर्थाने जागतिक व्यासपीठ १९८५ मध्ये नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत मिळाले. सक्षमीकरण म्हणजे केवळ आर्थिक स्वातंत्र्य नसून, त्यात सामाजिक सत्तेचे फेरवाटप ,संसाधनावर ताबा आणि राजकीय सहभागाचा समावेश होतो.

UNESCO नुसार:-सक्षमीकरण म्हणजे स्वतःबद्दल आणि समाजातील इतर घटकांबद्दल सामाजिक व राजकीय निर्णय घेण्याची क्षमता स्त्रीमध्ये निर्माण होणे म्हणजेच स्त्रियांचे सक्षमीकरण होते.

उद्दिष्ट:- स्त्रियांना त्यांच्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून देऊन त्यांना स्वतंत्रपणे कार्यप्रवृत्त करणे, हे या प्रक्रियेचे मुख्य ध्येय आहे.

ही लिंग समानतेवर आधारित एक व्यापक आणि दीर्घकालीन चालणारी प्रक्रिया आहे. यात स्त्रीचा आत्मविश्वास वाढवणे, कौशल्य विकास आणि निर्णय प्रक्रियेत तिचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे होय.

सक्षमीकरण ही प्रामुख्याने अशा समाज घटकांची प्रक्रिया आहे जे सत्ता, संपत्ती आणि सामाजिक प्रतिष्ठेपासून वंचित राहिले आहेत. विषमतेच्या पाशातून बाहेर पडून वंचितांना त्यांचे हक्क मिळवून देणे हाच सक्षमीकरणाचा मुख्य उद्देश आहे. वर्षांनुवर्षे दुय्यम स्थान मिळालेल्या महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून देण्यासाठी त्यांचे राजकारणात सक्रिय असणे अनिवार्य आहे. महिलांची प्रगती ही त्यांच्या सत्तेतील वाट्यावर अवलंबून असते.
कोणत्याही समाजातील स्त्रियांचा दर्जा हा त्या समाजाच्या निर्णय प्रक्रियेत त्यांच्या किती सहभागआहे यावरून ठरतो.

महिला सक्षमीकरण ही केवळ स्त्रियांना अधिकार देण्याची प्रक्रिया नसून, ती समाजाच्या सर्वांगीण विकासाची गुरुकिल्ली आहे. सक्षमीकरणाचा अर्थ केवळ राजकीय सहभाग असा मर्यादित न ठेवता, तो मानवी हक्क आणि सामाजिक न्यायाशी जोडला जाणे आवश्यक आहे.

**आर्थिक स्वावलंबन आणि अधिकार :-**

स्त्री जेव्हा स्वतःच्या पायावर उभी राहते, तेव्हा तिचे कुटुंबातील स्थान आपोआप उंचावते. संपत्तीवर मालकी हक्क असणे आणि समान कामासाठी पुरुषांइतकेच वेतन मिळणे, हे आर्थिक सक्षमीकरणाचे निकष आहे .आज 'स्टार्टअप' आणि 'बचत गट' यांच्या माध्यमातून महिला उद्योजकतेची नवीन शिखरे सर करत आहेत. तसेच 'एक मुलगी शिकली की संपूर्ण कुटुंब शिकते' या उक्तीप्रमाणे, शिक्षण हे स्त्रियांना त्यांच्या हक्क ाची जाणीव करून देते. केवळ पदवी मिळविणे म्हणजे शिक्षण नव्हे, तर समाजात वावरताना स्वतःची मते ठामपणे मांडण्याचे धाडस निर्माण होणे, हे सक्षमीकरणाचे खरे यश आहे .संविधानाने महिलांना दिलेले कायदेशीर कवच ,जसे की कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा किंवा कामाच्या ठिकाणच्या संरक्षणाचे नियम, स्त्रियांना निर्भयपणे जगण्यास मदत करतात. समाजातील स्त्रियांचा दर्जा तेव्हाच बदलेल जेव्हा स्त्रिया स्वतःला पुरुषांपेक्षा कमी समजणे थांबवतील .स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणं, स्वतःचे निर्णय स्वतः घेणे आणि रूढी परंपरांच्या बेड्या तोडून बाहेर पडणे ही मानसिक सक्षमीकरणाची लक्षणे आहेत.

**निष्कर्ष:-** स्वातंत्र्य मिळून अनेक दशके उलटली तरी, भारतीय स्त्री आजही मध्ययुगीन मानसिकतेच्या सावटाखाली जगत आहेत ही एक विदारक वस्तुस्थिती आहे. केवळ मुठभर स्त्रियांना स्वातंत्र्य मिळणे म्हणजे सर्व स्त्रियांना मानवी अधिकार मिळणे असे होत नाही. आजही ग्रामीण भागातील स्त्रिया, दलित ,आदिवासी, भटक्या-विमुक्त जमातीतील महिला आणि मुस्लिम भगिनी उपेक्षेचे आयुष्य कंठत आहेत. या सर्व वंचितापर्यंत पोहोचून त्यांना त्यांच्या सामाजिक स्थानाची जाणीव करून देणे आणि त्यांना त्यांचे मूलभूत मानवी हक्क मिळवून देणे हेच करा स्त्रीवादाचे ध्येय आहे. स्त्रीवादामुळे निर्माण झालेली स्वाभिमानाची ही जाणीव केवळ महिलांपूरतीच मर्यादित राहून चालणार नाही. जर आपल्याला भारताची सामाजिक स्थिती खऱ्या अर्थाने बदलायची असेल, तर हा आत्मसन्मान पुरुषांच्या मनातही रुजणे आवश्यक आहे. जेव्हा समाजातील प्रत्येक घटकांमध्ये मानवतावादाची जाणीव निर्माण होईल, तेव्हाचा स्त्रीवादाचा लढा खऱ्या अर्थाने यशस्वी होईल.

**संदर्भग्रंथ सूची:-**


- पाटील, डॉ. दीपक (२०२४): प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा, अथर्व पब्लिकेशन, धुळे
- विकिपीडिया (२०२४) : भारतीय ज्ञान परंपरा
  http://hi. wikipedia.org/wiki/भारतीय ज्ञान परंपरा
- महाजन, डॉ. जयश्री (२०१७): स्त्रिया आणि लिंगभाव, अथर्व पब्लिकेशन्स ,धुळे
- भागवत, विद्युत (२०१४): जमीन संसाधने आणि उदरनिर्वाहाची साधने, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे
- घोडेस्वार,डॉ. प्रवीण (२०२०): कमला भसीन स्त्रीवादी तत्त्वचिंतक, हरीती पब्लिकेशन्स ,वाकड ,पुणे
- कुलकर्णी सीमा, भट स्नेहा (२०१७): जमीन आणि इतर संसाधने: स्त्रिया समानतेच्या अधिकारी आहेत का?, प्राईम इंटरप्राईजेस, पुणे
- देहडराव स्वाती, तांबे अनघा (२००९): स्त्रियांचे सामाजिक सक्षमीकरण, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.